महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ ०६ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २२१ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### योजना जगतात, माणसं मरतात!

पालघर जिल्ह्यातील आदिवासी–ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचा आजचा चेहरा हा केवळ अपयशाचा नाही, तर प्रशासकीय असंवेदनशीलतेचा आरसाच बनला आहे. सरकार दरवर्षी नव्या योजना जाहीर करत आहे, कोट्यवधींचा निधी मंजूर करत आहे; मात्र आदिवासी पाड्यांवर आजही उपचाराअभावी माणसं मरत आहेत—हा विरोधाभास नाही, तर थेट व्यवस्थेचा गुन्हा आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे कागदावर अस्तित्वात आहेत; प्रत्यक्षात ती कुलूपबंद, डॉक्टरविना किंवा औषधांविना आढळतात. गरोदर माता, कुपोषित बालके, तापाने फणफणणारे रुग्ण हे सर्व 'योजना' नावाच्या फाईल्समध्ये दिसत नाहीत. त्यामुळे मृत्यू झाला की चौकशी, अहवाल, आश्वासने—आणि पुन्हा तीच उदासीन शांतता, असा चक्रव्यूह गेली अनेक वर्षे सुरू आहे.

मोबाईल मेडिकल युनिट्स, विशेष आदिवासी आरोग्य अभियान, माता–बाल योजना अशा गोंडस नावांच्या योजनांचा गाजावाजा होतो; पण दुर्गम पाड्यांपर्यंत त्या पोहोचतात का, याची कुणालाच पर्वा नाही. रस्ते नाहीत, वाहतूक नाही, कर्मचारी टिकत नाहीत—हे सगळे प्रश्न प्रशासनाला माहीत असूनही 'आढावा बैठकां'पलीकडे कोणतीही ठोस कृती होत नाही. पावसाळा आला की कुपोषण, अतिसार, मलेरिया, डेंग्यू यांचे संकट वाढते. तरीही आदिवासी भागांसाठी स्वतंत्र आपत्कालीन आरोग्य यंत्रणा उभारण्यात शासन अपयशी ठरले आहे. प्रत्येक मृत्यूनंतर 'दुर्दैवी घटना' असा शिक्का मारून हात झटकले जातात; पण हे मृत्यू दुर्दैवी नसून पूर्वानुमानित आहेत, हे मान्य करण्याचे धैर्य कुणी दाखवत नाही. खरा प्रश्न असा आहे की, आदिवासी नागरिक हे केवळ आकडे आहेत का? निवडणुकीपुरते फोटो आणि घोषणांसाठी उपयोगी, आणि नंतर विसरायला मोकळे? जर उत्तर 'नाही' असेल, तर आरोग्य केंद्रे प्रत्यक्ष कार्यरत का नाहीत, पदे रिक्त का आहेत, आणि जबाबदारी निश्चित का होत नाही?

जोपर्यंत आदिवासी आरोग्याला केवळ अनुदानाचा विषय न मानता मानवी हक्क म्हणून पाहिले जात नाही, तोपर्यंत योजना वाढतील, भाषणं गाजतील—आणि पाड्यांवर मात्र मृत्यू थांबणार नाहीत. ही केवळ अपयशी व्यवस्था नाही, तर शासनाच्या संवेदनशीलतेची कठोर परीक्षा आहे—आणि सध्या तरी त्या परीक्षेत सरकार नापासच ठरत आहे.

# भावली पाणी योजनेचे अस्तित्व धोक्यात ? दोनशे कोटी 'पाण्यात' जाणार !

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. ५

**शहापूर : अनेक योजना जाहीर होऊनही शहापूर तालुक्यातील नागरिकांना दरवर्षी भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर भावली धरणातून गुरुत्वाकर्षण पद्धतीने पाणी उचलून शहापूर तालुक्याला देण्याची महत्त्वाकांक्षी योजना आखण्यात आली होती. या योजनेचे सुमारे ७० टक्के काम पूर्ण झाले असतानाच आता या योजनेचे अस्तित्वच धोक्यात आल्याने तालुक्यात चिंता व्यक्त केली जात आहे.**



भावली पाणी योजनेसाठी वाय टॅपिंगद्वारे पाणीपुरवठा करण्यास जलसंपदा विभागाने तब्बल ८ वर्षांपूर्वी परवानगी दिली होती. मात्र आता याच विभागाने धरणाच्या आऊटलेटमधून बाय टॅपिंग करण्यास हरकत घेतल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. शासनाच्या या धरसोड धोरणामुळे आतापर्यंत खर्च झालेले सुमारे २०० कोटी रुपये वाया जाण्याची भीती असून, तालुक्यातील ३५६ गावपाड्यांच्या नशिबी पुन्हा एकदा तीव्र पाणीटंचाई येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**■ नवीन विहिरीचा पर्याय धोकादायक**

वाय टॅपिंगला विरोध कायम राहिल्यास पर्यायी योजनेसाठी २७ दशलक्ष लिटर क्षमतेची स्वतंत्र विहीर उभारावी लागणार आहे. मात्र दररोज इतक्या प्रमाणात पाण्याचा उपसा केल्यानंतर दुसऱ्या दिवशी तितकाच पाणीसाठा उपलब्ध होईल, याची कोणतीही शाश्वती नाही. विशेषतः उन्हाळ्यात धरणातील पाण्याची पातळी तळ गाठत असल्याने ही विहीर कोरडी पडण्याचा धोका नाकारता येत नाही. शहापूर तालुक्यातील माळ पठार, कसारा विभाग, शिरोळ-अजनुप विभाग, वाशाळा विभाग, तलवाडा पठार, साकडबाव पठार, डोळखांब विभाग, टाकीपठार, खर्डी व बिरवाडी परिसरातील ९७ गावे व २५९ पाड्यांना दरवर्षी डिसेंबर ते मे या कालावधीत तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. तालुक्यातील बहुतांश धरणे सखल भागात असून गावे-पाडे उंच पठारावर असल्याने लिफ्ट पाणी योजना अपयशी ठरत आहेत. या पार्श्वभूमीवर शहापूर तालुक्याची कायमची पाणीटंचाई दूर करण्यासाठी शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा करून गुरुत्वाकर्षण पद्धतीने भावली पाणी योजनेला मंजुरी मिळाली होती. मात्र आता हीच योजना अडचणीत सापडल्याने शहापूरवासीयांच्या पाण्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## 356 गावपाड्यांच्या नशिबी पुन्हा पाणीटंचाई

# समित्या आणि पदांसाठी ठाण्यात जोरदार लॉबिंग

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. ५

**ठाणे** : ठाणे महापालिकेतील महापौर व उपमहापौरपदांचा तिढा सोडवण्यात शिवसेना शिंदे गटाला यश मिळाल्यानंतर आता विविध महत्त्वाच्या समित्या आणि पदांवर आपले स्थान निश्चित करण्यासाठी राजकीय घडामोडींना वेग आला आहे. स्थायी समिती, सभागृह नेतेपद, शिक्षण मंडळ, विषय समित्या, प्रभाग समित्या तसेच वृक्ष प्राधिकरण समितीमध्ये स्थान मिळवण्यासाठी नगरसेवकांकडून पक्षनेतृत्वाकडे जोरदार लॉबिंग सुरू असल्याचे चित्र सध्या ठाण्यात पाहायला मिळत आहे. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत शिंदे गटाच्या शिवसेनेने ७५ जागांवर विजय मिळवला असून, भाजपला २८ जागा मिळाल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) १२, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ९,




एमआयएम ५, शिवसेना ठाकरे गट १ आणि अपक्ष १ अशा एकूण १३१ नगरसेवकांचे सभागृह तयार झाले आहे. निवडणुकीनंतर सुरुवातीला सत्तेबाहेर राहण्याची भूमिका घेतलेल्या भाजपने अखेर सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे.

सत्तेत सहभाग घेतल्यानंतर भाजपने स्थायी समिती, परिवहन समिती, शिक्षण मंडळासह विविध समित्यांमध्ये समसमान प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी दबाव वाढवला आहे. पहिल्या वर्षाचे स्थायी समिती सभापतिपद भाजपकडे यावे, यासाठी पक्षाकडून हालचालींना वेग आला असून, शिंदे गट मात्र स्थायी समितीवरील नियंत्रण आपल्याकडेच ठेवण्याच्या भूमिकेवर ठाम आहे. स्थायी समितीच्या सभापतिपदासह सदस्यत्व मिळवण्यासाठी अनेक इच्छुकांनी पक्षश्रेष्ठींकडे जोरदार फिल्डिंग लावल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, सभागृह नेतेपदासाठी तरुण चेहऱ्याला संधी देण्याचा विचार शिंदे गटात सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

परिवहन समिती, शिक्षण मंडळ, विषय समित्या तसेच प्रभाग समित्यांवर स्थान मिळवण्यासाठीही नगरसेवकांमध्ये मोठी चढाओढ सुरू आहे. नगरसेवक झाल्यानंतर किमान एखाद्या महत्त्वाच्या समितीवर संधी मिळावी, यासाठी वरिष्ठ नेत्यांची दारे ठोठावण्याची धावपळ सध्या सुरू असल्याचे चित्र ठाणे महापालिकेत दिसून येत आहे.

## आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते गोवेली येथे विकासकामांचा शुभारंभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. ५

**टिटवाळा** : कल्याण तालुक्यातील गोवेली येथील क्रीडासंकुल मैदानात विविध विकासकामांचा शुभारंभ आमदार किसन कथोरे यांच्या शुभहस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. या विकासकामांमुळे परिसरातील क्रीडाप्रेमी युवकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार आहेत.



या कार्यक्रमास आमदार किसन कथोरे यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवींद्र घोडविंदे, संचालक वसंत लोणे, योगेश धुमाळ, रविंद्र भोईर, किशोर वाडेकर सुरोशी, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष अरुण पाटील, शिवसेना तालुका प्रमुख वसंत लोणे, नायब तहसीलदार पंजाबराव पवार, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, तालुका क्रीडा अधिकारी सायली जाधव, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या जयश्री सासे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी पोल सर, बेहरे–खडवली ग्रामपंचायतीच्या सरपंच प्रियांका भोईर, भाजप तालुकाध्यक्ष शेखर लोणे, देवीदास चौधरी, संजय शेलार, अनंता दोरलेकर, भाऊ सुरोशी, जगन्नाथ शेलके, दीपक भोईर, भगवान सुरोशी, नरेश कथोरे व सुनील गायकर आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार किसन कथोरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे गोवेली येथील क्रीडासंकुल मैदानात क्रिकेटव्यतिरिक्त इतर खेळांसाठी भव्य हॉल उभारण्यात येणार आहे. या हॉलमध्ये कबड्डी, खो-खो, बुद्धिबळ, कुस्ती तसेच व्हॉलीबॉलसारख्या विविध क्रीडा प्रकारांसाठी सुविधा उपलब्ध होणार असून, त्यामुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या विकासकामांमुळे गोवेली व परिसरातील युवकांना क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्यासाठी नवी संधी उपलब्ध होणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.



## रखडलेली विकासकामे आणि नागरिकांच्या आरोग्यावर विशेष भर – महापौर हर्षाली चौधरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. ५

**कल्याण** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील रखडलेली विकासकामे प्राधान्याने मार्गी लावण्यासाठी आपण स्वतः पुढाकार घेणार असून, शहरातील नागरिकांचे आरोग्य लक्षात घेऊन आरोग्य विभाग पूर्ण क्षमतेने कार्यरत राहील, अशी ग्वाही नवनिर्वाचित महापौर ॲड. हर्षाली चौधरी-थविल यांनी दिली. महापौर पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर त्या माध्यमांशी बोलत होत्या.

मागील पाच वर्षांच्या कालावधीत आपण नगरसेविका म्हणून कार्यरत होतो. या काळात शहरातील विविध विकास प्रश्न व नागरी समस्यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाल्याचे त्यांनी सांगितले. शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर असून, तोसह अन्य नागरी प्रश्न प्राधान्याने सोडविण्यावर आपला भर राहील, असेही महापौर चौधरी-थविल यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, उपमहापौर राहुल दामले यांनी सांगितले की, मागील सहा वर्षांच्या कालावधीत महानगरपालिकेत प्रशासकीय राजवट होती. या काळात स्मार्ट सिटीसह शहर विकासाचे अनेक प्रकल्प सुरू असून, ते सर्व प्रकल्प विहित वेळेत पूर्ण व्हावेत यासाठी विशेष लक्ष दिले जाणार आहे. टिटवाळा ते माणकोली, काटई बाह्यवळण रस्ता, कल्याण-डोंबिवली शहरातील वाहतूक कोंडी, कचरा व्यवस्थापन, आरोग्यविषयक प्रश्न हे महत्त्वाचे मुद्दे असून, नागरिकांच्या गरजा ओळखून सर्वपक्षीय नगरसेवकांशी चर्चा करून युतीच्या माध्यमातून शहर विकासाचे दर्जेदार प्रकल्प मार्गी लावण्याला प्राधान्य देण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले.




# उल्हासनगर : सत्तास्थापन झाली; मतभेद मात्र कायम !

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. ५

**उल्हासनगर** : उल्हासनगर महापालिका निवडणुकीदरम्यान एकमेकांविरोधात आरोपांची राळ उडवणारे कलानी समर्थक आणि भाजप पदाधिकारी अखेर शिवसेनेच्या माध्यमातून एकत्र सत्तेत आले आहेत. कलानी समर्थकांच्या अश्विनी निकम महापौरपदी, तर भाजपच्या उपमहापौरपदी निवडीनंतर सत्तास्थापना झाली असली तरी दोन्ही गटांतील मतभेद संपलेले नसल्याचे स्पष्ट चित्र शहरात दिसून येत आहे. महापौर अश्विनी निकम यांच्या अभिनंदनाचे फलक शहरात कलानी गटाकडून लावण्यात आले आहेत. मात्र या फलकांवर 'दोस्ती का गठबंधन' असा उल्लेख करून भाजपचा थेट नामोल्लेख टाळण्यात आल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. दुसरीकडे, भाजपच्या प्रचारप्रमुखांनीही आम्ही सत्तेत असलो तरी पहारेकरी म्हणून काम करू आणि गुंडगिरीविरोधातील भूमिका कायम राहील, असे स्पष्टपणे सांगितले आहे. त्यामुळे कमकुवत विरोधी पक्षाची भूमिका सत्ताधारीच पार पाडणार का, असा सवाल उपस्थित होत आहे. उल्हासनगर महापालिकेत विचित्र राजकीय सत्तासमीकरणांचा इतिहास जुना आहे. एकमेकांविरोधात लढणारे पक्ष सत्तेसाठी एकत्र येण्याची परंपरा यंदाही कायम राहिली आहे. नुकत्याच झालेल्या पालिका निवडणुकीत शिवसेनेने टीम ओमी कलानी, साई पक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आणि पीआरपी यांच्यासोबत युती करून निवडणूक लढवली होती, तर भाजपने स्वबळावर निवडणूक लढवली होती. मात्र कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. शिवसेनेने ३६ जागा मिळवल्यानंतर वंचित बहुजन आघाडी व अपक्षांच्या पाठिंब्यावर सुरुवातीला सत्तेचे गणित जुळवले होते. मात्र वरिष्ठ नेत्यांच्या आदेशानंतर भाजपसोबत युती करण्याची वेळ शिवसेनेवर आली. परिणामी उपमहापौरपदासह सत्तेतील वाटा भाजपला देण्यात आला. सत्तेत सहभागी असूनही आरोप–प्रत्यारोप सुरूच राहिल्याने तणाव वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# कल्याण–डोंबिवलीच्या तीन नगरसेवकांना बेकायदा बांधकाम भोवणार ?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. ५

**कल्याण** : डोंबिवली पश्चिमेतील बेकायदा इमारत व बंगला बांधकामांशी थेट संबंध असल्याचा आरोप असलेल्या आणि अपात्रतेच्या वाटेवर असलेल्या तीन नगरसेवकांना महापालिका तसेच जिल्हा प्रशासनाने कोणताही निधी उपलब्ध करून देऊ नये, तसेच आगामी अर्थसंकल्पात त्यांच्यासाठी कोणतीही तरतूद करू नये, अशी ठाम मागणी तक्रारदार कल्पेश जोशी यांनी केली आहे. याबाबत त्यांनी महापौर ॲड. हर्षाली चौधरी-थविल आणि आयुक्त अभिनव गोयल यांच्याकडे निवेदन दिले आहे. या प्रकरणी राज्य निवडणूक आयोग आणि कोकण विभागीय आयुक्तांकडे आधीच तक्रार दाखल करण्यात आली असून, जिल्हा नियोजन व विकास विभागामार्फत शहर विकासासाठी मिळणारा निधी देखील या तीन नगरसेवक व नगरसेविकांना वितरित करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. त्यांच्या प्रभागातील विकास कामांच्या नस्ती घाईघाईने दाखल करून त्या मंजूर करून निधी वितरित केला जाण्याची शक्यता असल्याने, पूर्वसूचना म्हणून ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्याचे जोशी यांनी तक्रारीत नमूद केले आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडेही स्वतंत्र तक्रार करण्यात आली आहे.

या तीन नगरसेवकांचा डोंबिवली पश्चिमेत बेकायदा इमारत प्रकरणाशी थेट संबंध आला आहे. बेकायदा चाळी, इमारती बांधून गडगंज संपत्ती जमवायची आणि त्या




माध्यमातून उधळपट्टी करून पुन्हा नगरसेवक म्हणून निवडून यायचे हा कल्याण डोंबिवली शहरातील काही नगरसेवकांचा 'व्यवसाय' झाला आहे. त्यामुळे हा बेकायदा व्यवसाय रोखण्यासाठी आपण या तीन नगरसेवकांच्या तक्रारी कोकण विभाग आयुक्त, राज्य निवडणूक आयोगाकडे केल्या आहेत.

सत्य प्रतिज्ञापत्रावर आपण ही माहिती दिली आहे. आपल्या तक्रारीची दखल कोकण विभागीय आयुक्तांनी घेतली आहे. या विभागाच्या नगरपालिका प्रशासनाने पालिका आयुक्तांना पत्र पाठवून बेकायदा बांधकामांमुळे अडचणीत आलेल्या तीन नगरसेवकांची चौकशी करून त्यांचा इत्यंभूत अहवाल दाखल करण्याचे आदेश दिले आहेत, असे तक्रारदार जोशी यांनी सांगितले. नगरसेविकांचे पती, नगरसेवकाच्या मुलाने केलेल्या बेकायदा बांधकाम उद्योगांमुळे हे नगरसेवक अडचणीत आले आहेत.

### ■ अर्थसंकल्पात तरतूद नको !

कल्याण–डोंबिवली महापालिकेचा अर्थसंकल्प ३१ मार्चपूर्वी मांडला जाणार असून, दरवर्षी नगरसेवकांसाठी विकास कामांच्या नावाखाली विशेष तरतूद केली जाते. मात्र, अपात्रतेच्या चौकशीत असलेल्या या तीन नगरसेवकांसाठी कोणतीही आर्थिक तरतूद करण्यात येऊ नये, अशी स्पष्ट मागणी तक्रारदाराने केली आहे. बहुतांश नगरसेवक आमदार व खासदारांच्या माध्यमातून प्रभागात विकास निधी आणतात. मात्र डोंबिवली पश्चिमेतील हे तीन नगरसेवक थेट बेकायदा बांधकामांशी संबंधित असल्याने, इतर कोणत्याही लोकप्रतिनिधींनी त्यांना विकास निधी देण्याची जोखीम घेऊ नये, अशी तक्रार आपण ठाणे जिल्ह्यातील आमदार व खासदारांकडेही करणार असल्याचे कल्पेश जोशी यांनी स्पष्ट केले आहे

### काँग्रेस प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांच्या हस्ते

# केडीएमसी नगरसेवकांचा सत्कार



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका संदर्भात काँग्रेसच्या सर्व पदांसाठी नियुक्तांचे अधिकार हे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांना देण्यात आले आहेत. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष व प्रभारी राजन भोसले यांच्या अध्यक्षतेखाली प्रदेश काँग्रेसचे ऑफिस टिळक भवन येथे पार पडलेल्या बैठकीत सर्वांच्या सहीने हा ठराव करण्यात आला

प्रदेश काँग्रेसचे ऑफिस टिळक भवन येथे नविन निवडून आलेल्या कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या नगरसेविका कांचन कुलकर्णी व समीना शेख यांचा काँग्रेस प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या तर्फे सत्कार करण्यात आला. त्यावेळी प्रदेश सरचिटणीस एडवोकेट नविन सिंग, सरचिटणीस ब्रिज दत्त, जिल्हाध्यक्ष राजाभाऊ पातकर, सुरेंद्र आढाव, वर्षा शिखरे, राजेश तिवारी, सलीम शेख, योगेश कुलकर्णी व अन्य काँग्रेस चे पदाधिकारी उपस्थित होते. सत्कार झाल्यानंतर राजन भोसले यांच्या दालनात निवडून आलेल्या नगरसेवक व प्रदेश पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष यांची बैठक झाली. त्या बैठकीत "कल्याण डोंबिवली महानगरपालिका संदर्भात सर्व पदांसाठी नेमणुका करण्याचे आधिकार प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना देण्यात आल्याचा ठराव सर्वांच्या सहीने करण्यात आला.

# 'एक हात मदतीचा' सामाजिक ग्रुपच्या वतीने विद्यार्थ्यांचा सन्मान

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबाडी** : भिवंडी तालुक्यातील मौजे- कुंदे येथे 26 जानेवारी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून इयत्ता-10 मध्ये शालान्त परीक्षेत विशेष नैपुण्य मिळविणाऱ्या गुणवान विद्यार्थ्यांचा गुणगौरव " एक हात मदतीचा ग्रुप कुंदे " यांच्याकडून सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

जिल्हा परिषद शाळा कुंदे या शाळेचे सेवानिवृत्त आदर्श शिक्षक "भगवान गोपाळ पाटील" यांच्या प्रेरणेतून याच गावातील माजी- विद्यार्थी की,जे नोकरी-व्यवसाय करीत आहेत,अशांनाच एकत्र करून " एक हात मदतीचा ग्रुप कुंदे" स्थापन करून शैक्षणिक बाबतीत समाजातील आर्थिक दुर्बल आणि विशेषतः गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठीच या सामाजिक जाणीवेतून कार्य करणाऱ्या ग्रुपने आपली सामाजिक बांधिलकी स्विकारून कार्य करण्याचा संकल्प ठेवलेला आहे.

याचाच एक भाग म्हणून 2024/25 या वर्षांत इयत्ता 10 वी मध्ये शालान्त परीक्षेत 60 टक्केपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले.यावेळेस ज्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव




करण्यात आला,अशा विद्यार्थ्यांना प्रत्येकी कुंदे गावातील ग्रामस्थ रतन शेलार यांच्याकडून रुपये 500 चे बक्षिस देण्यात आले. यावेळेस मंचकावर मान्यवर पैकी सरपंच-प्रमोद बरफ,उपसरपंच-जितेंद्र पाटील,ग्रामस्थ रघुनाथ भोईर,प्रल्हाद म्हात्रे,यशवंत सुतार,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष आदिंची आवर्जुन उपस्थिती होती. यावेळेस " एक हात मदतीचा" या ग्रुपचे संस्थापक "भगवान पाटील गुरूजी" यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की,ज्या विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षणात काही अडीअडचणी यापुढील काळात निर्माण होतील अशा विद्यार्थ्यांसाठी "एक हात मदतीचा ग्रुप कुंदे" त्यांच्या सदैव पाठीशी उभा राहून त्यांना सर्वतोपरी मदत करील.मग ती शैक्षणिक साहित्य त्याचबरोबर ट्युशन्स संबंधित खर्च असेल किंवा तत्सम.ज्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला ते इयत्ता दहावीतील विद्यार्थी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत म्हणजेच गाव-खेडयातून 4/5 किलोमीटर अंतरावरून पायी प्रवास करून आपले माध्यमिक शिक्षण घेत आहेत,आणि या मेहनतीमधून ही मुल इयत्ता 10 वी शालान्त परीक्षेत कोणतीही सुविधा नसताना 84 टक्केअशा स्वरूपाचे गुण मिळवून सुयश प्राप्त करतात अशा गुणवान विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारून त्यांना प्रोत्साहन देणे हे खऱ्या अर्थाने समाजाचे कर्तव्य आहे,अशा प्रकारच्या भावना "भगवान पाटील गुरूजी" यांनी या गुणगौरव समारंभ प्रसंगी व्यक्त केल्या.

सदर गुणगौरव समारंभाचे सूत्रसंचालन सौ.मोहेकरबाई यांनी केले,तर आभार मुख्याध्यापिका सौ.पाटीलबाई यांनी मानले.एकंदरीत या "एक हात मदतीचा ग्रुप कुंदे" या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या समाजसेवकांचे परिसरात अभिनंदन करण्यात येत आहे.

# आरएसपी नोडल ऑफिसर म्हणून वाल्मिकी शाळेतील शिक्षकाचा सत्कार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळ अटळी, कल्याण संचालक वाल्मिकी प्राथमिक माध्यमिक विद्यालय अटाळी, शाळेतील सहाय्यक शिक्षक गणेश गायकवाड यांनी डिसेंबर मध्ये ठाणे पोलीस आयुक्तालय क्रीडा संकुल, ठाणे यथे आर.एस. पी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले असून "आर. एस. पी. नोडल ऑफिसर" म्हणून



निवड झाली आहे. या बद्दल संस्थेचे अध्यक्ष मनोहर पाटील, कार्याध्यक्ष अंबादास पाटील, सचिव दशरथ तरे आणि शाळेच्या मुख्यध्यापिका नंदा पाटील, छाया पाटील, तसेच संस्थेचे उपस्थित सर्व पदाधिकारी मान्यवर यांच्या हस्ते प्रमाणपत्र, शाल आणि पुष्पगुछ देऊन गौरविण्यात आले.

या शाळेमध्ये आर.एस. पी. युनिटची स्थापना करून लवकरच शाळेतील विद्यार्थी तथा नागरिकांच्या सुरक्षातेसाठी हे पथक पोलिसांना सहकार्य करण्यासाठी रोडवर देखील उतरून काम करण्यासाठी सज्ज होणार आहे. तसेच दिल्लीत होणाऱ्या संचालनाची तयारी सुरु केली आहे. या प्रशिक्षणासाठी शाळेतील चौधरी आणि इतर सहकारी शिक्षक यांनी पुढाकार घेतला असून आर.एस. पी. कल्याण जिल्हा समन्वय अधिकारी मनीलाल शिंपी, अनंत किनगे, उपसमादेशक जिल्हा विनोद शेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील वाटचाल केली जाणार आहे.

# येऊर वनपरिक्षेत्रातील नागला परिमंडळात मृत बिबट्याबाबत वनअधिकाऱ्यांचा खुलासा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : दि.19 डिसेंबर 2025 रोजी, भाईंदर येथील मानवी वस्तीमधून रेस्क्यू करण्यात आलेल्या नर बिबट्यास वैद्यकीय तपासणीकरिता उप संचालक (दक्षिण) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांच्या अधिनस्त क्षेत्रात उपलब्ध सुविधा तसेच पशुवैद्यकीय अधिकारी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांच्या निगराणीत ठेवण्यात आले होते, पकडलेल्या बिबट्याचे मुक्तेबाबत गठीत समितीची दि.22 डिसेंबर 2025 रोजी बैठक होऊन त्यामध्ये चर्चेअंती समितीने सर्व बाबींचा विचार केल्यानंतर बिबट्याला Satellite Collar लावून त्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्याचा निर्णय मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम प्रदेश मुंबई व वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांच्या मार्गदर्शनाखाली घेतला.

त्यानुषंगाने रेस्क्यू केलेल्या बिबट्यास Satellite Collar बसविण्यात आली असून, या बिबट्याची वैद्यकीय तपासणी पूर्ण झाल्यानंतर व त्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर दि.25 डिसेंबर 2025 रोजी रात्री 9.25 च्या सुमारास सदर बिबट्याला येऊर वनपरिक्षेत्रातील परिमंडळ नागला, नियतक्षेत्र ससुनवघर सर्वे क्रमांक-58 मधील वनक्षेत्रामध्ये नैसर्गिक अधिवासामध्ये मुफ्त करण्यात आले होते. या बिबट्याला नैसर्गिक अधिवासामध्ये मुक्त करतेवेळी सुदृढ, चपळ असल्याचे दिसून आले तसेच त्यास बसविलेले Satellite Collar चालू स्थितीत असून, वन्यजीव बचाव पथक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येऊर वनपरिक्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी व WCS एनजीओ प्रतिनिधी यांच्यामार्फत पुढील संनियंत्रण करण्यात येत होते.

दि.25 डिसेंबर 2025 पासून ते दि.30 डिसेंबर 2025 पर्यंत या बिबट्याचा ससुनवघर नियतक्षेत्रामध्ये त्याचा वावर दिसून आला होता. Satellite collar Signal location नुसार त्याचे प्राप्त स्थळ वनक्षेत्रातीलच होते. येऊर वनपरिक्षेत्रातील परिमंडळ नागला, नियतक्षेत्र ससुनवघर सर्वे क्रमांक 58 मधील वनक्षेत्रामध्ये नैसर्गिक अधिवासामध्ये मुक्त करण्यात आलेल्या बिबट्याने दि.31 डिसेंबर 2025 रोजी, ससुनवघर वनखंड क्रमांक- 1115 या क्षेत्रातील गुफा असलेल्या क्षेत्रामध्ये कुत्र्याची शिकार केल्याचे आढळून आले होते, त्यानंतर या बिबट्यास मुक्त केलेल्या ठिकाणी हा बिबट्या फिरती करीत असल्याचे निदर्शनास आले असून, दि.05 जानेवारी 2026 रोजी नागला ट्रेल वरती जागोजागी पायाने उकरल्याले तसेच त्याची विष्टा आढळून आली होती. Satellite collar Signal द्वारे ही माहिती मिळाली असून, हा बिबट्या शारिरीकदृष्ट्या सुदृढ असल्याचे कॅमेरा ट्रपमध्ये दिसून आला होता.

परंतू दि.02 फेब्रुवारी 2026 रोजी, संध्याकाळी या बिबट्याला लावलेला Satellite collar चा Mortality Signal आल्याने, येऊर वनपरिक्षेत्रातील, परिमंडळ नागला, नियतक्षेत्र नागला राखीव वन सर्वे क्रमांक-73, वनखंड क्रमांक- 1118 मध्ये तात्काळ या विभागातील अधिकारी / कर्मचारी तसेच श्री. निकेत सुर्वे, डब्ल्युसीएस इंडिया व टीम यांनी घटनास्थळ जाऊन पाहणी केली असता, हा बिबट्या मृत्युमुखी पडल्याचे दिसून आले आहे. या बिबट्याचे शव असलेल्या परिसराचा पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा नोंदविला. या बिबट्याची नखे, दात व इतर महत्वाचे अवयव सुस्थितीत आढळून आले आहे. नैसर्गिक उजेड कमी झाल्याने या बिबट्याचे शव विच्छेदन करणे शक्य झाले नाही.

दि.03 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी डॉ.निखिल बांगर, पशुवैद्यकीय अधिकारी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली व डॉ.प्रशांत गाढवे, मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय यांच्याद्वारे नियमानुसार शवविच्छेन (Post-mortem) प्रक्रिया केली असून, नमुने वैद्यकीय व तांत्रिक तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मृत्यूचा कारणाबाबत निष्कर्ष काढता येईल. याबाबत परिमंडळ नागला वनगुन्हा क्रमांक-डब्ल्युएल-01/ दि.02 फेब्रुवारी 2026 अन्वये वनगुन्हयांची नोंद करण्यात आली असून, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम-1972 अन्वये पुढील आवश्यक कार्यवाही डॉ.जितेंद्र रामगावकर, मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम प्रदेश, मुंबई, सौ.अनिता पाटील, वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली व श्री. प्रदीप पाटील, उप संचालक (उत्तर) येऊर संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे, अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी, येऊर संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांनी दिली आहे.

# सी- टीईटी देणाऱ्या शिक्षकांना निवडणूक कामातून सूट

### राज्य शिक्षक परिषदेच्या पाठपुराव्याला यश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा सीईटी देणाऱ्या शिक्षकांना जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या कर्तव्यातून सूट देण्यात आली असून तसे निर्देश सर्व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसाचा दुखावटा जाहीर करण्यात आल्यावर 12 जिल्हा परिषद व 125 पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या मतदानाच्या तारखेत बदल करण्यात आला. त्यानुसार आता दिनांक पाच ऐवजी सात फेब्रुवारीला मतदान होणार आहे. त्याचवेळी राज्यातील सीटीईटी परीक्षा असल्यामुळे संबंधित शिक्षकांना निवडणूक कर्तव्यातून सूट देऊन पर्यायी व्यवस्था करण्याबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत. सीएटी परीक्षा आणि निवडणुकीचे काम एकाच वेळी गोंधळ पाहता महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य अध्यक्ष वेणूनाथ कडू यांनी सर्वत्र पत्र व्यवहार करत गोंधळातून मार्ग काढण्याचे निवेदन दिले. भारतीय जनता पार्टीचे राज्य अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी तातडीने परिषदेच्या पत्राची दखल घेत पाठपुरावा केला व सीटीईटी देणाऱ्या शिक्षकांना निवडणुक कामातून सूट मिळवली. परिषदेचे कोकण विभाग अध्यक्ष गुलाबराव पाटील, कार्यवाह लक्ष्मण वालगुडे व अन्य पदाधिकाऱ्यांनी चव्हाण यांचे धन्यवाद व्यक्त करत आभार मानले.

# माणसातलाच देवमाणूस! खा.डॉ.श्रीकांतजी शिंदे

नेहमीच्या धावपळीत असतानाच मला एक निनावी फोन आला शेवटचा नंबर होता 694... मी म्हटलं आपण कोण बोलतायेत ? पलीकडून आवाज आला,सर मी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतला एक शिक्षक धनराज कुंनगीर सर बोलतोय.मला तुमचा नंबर माझे मित्र दिपक दिनकर सर आणि शिक्षणाधिकारी विजय सरकटे साहेब यांनी दिला आणि तो फोनवरच धाय मोकलून रडायलाच लागला. सर माझ्या मुलीला वाचवा हो.ती मरणाच्या दारात उभी आहे आणि ती केवळ चार वर्षाची आहे अहो सर तिचे खेळण्याचं, बागलण्याचं व जगण्याचं असताना ती एकप्रकारे मृत्युशी झुंज देत आहे,लढा देत आहे,तीव्र संघर्ष करीत आहे सर...!

सर,कृपया आपण मला कुठूनतरी काहीतरी वैदेकीय वा आर्थिक मदत मिळवून द्या,आपणच माझे संकटकाळातील खरे संकटमोचक आहात.सर आपण माझं संकट दूर कराल याचा मला ठाम विश्वास वाटतो.मी अत्यंत शांतपणे एकाग्र होऊन त्यांची कैफियत व व्यथा ऐकत होतो. मी म्हटलं...सर मी जरा गावी आलो आहे एक /दोन दिवसांनी आलो की आपण प्रत्यक्ष भेटून बोलूया तुम्हाला स्वतः मी फोन करतो आल्यानंतर मी त्यांना फोन केला सर तुम्ही या मी कल्याणात आलो आहे आपण काय तो मार्ग काढू या मी आणि माझे मित्र श्री. विलास जाधव सर व अनंत किंनगे सर आम्ही त्यांना शिवसेना वायले नगर शाखेत बोलावून घेतले.

आई,बाबा आणि त्यांच्या 4 वर्षाच्या आजारग्रस्त चिमुकलीला घेऊन माझ्याकडे आले त्या मुलीच्या डोळ्यात काहीतरी सद्भावना होत्या ती माझ्याकडे एकटक बघत होती परंतु ती अज्ञान असल्याने भविष्यात काय वाढवून ठेवले तिला काहीही ज्ञात नव्हतं तिच्या आजाराबद्दल तिला काहीच माहित नव्हतं आई-वडिलांच्या दोघांच्या डोळ्यात पाणी आलं आणि त्यांच्या अश्रूंना बांध फुटला आणि धाय मोकलून रडायला लागले मी त्यांना शांत केल ते बोलले सर माझी चार वर्षाची मुलगी राघवी आम्हाला तिच्या औषधोपचारासाठी काही 25 हजाराची मदत मिळेल काय ? मी म्हटलं तिला आजार काय आहे तेव्हा त्यांनी सांगितलं की तिला अत्यंत असाध्य थालेसिमिया हा आजार झाला आहे तो मेजर स्वरूपात आहे त्यामुळे तिचं रक्त तयार होत नाही दर पंधरा दिवसांनी रक्त द्यावं लागतं.एक डोनर भेटलेला आहे पण त्याचाच खर्च 12 लाख रुपये आहे. आजाराचं गांभीर्य आणि तीव्रता लक्षात घेता मी म्हटले 25 हजाराच्या तुटपुंज्या मदतीने तुमचं काहीच होणार नाही हॉस्पिटलचा 35 लाख खर्च अफाट आणि अवाढव्य आहे. त्यामधील 15 लाख हॉस्पिटल मदत करणार आहे मग मी विचारलं यापैकी तुम्ही किती रकमेची तरतूद केलेली आहे आपल्याला किती रकमेची गरज आहे.आई-वडील म्हटले सर्व जमापुंजी एकत्र करुन सर सध्यस्थितीत आमच्याकडे चार ते 5 लाख रुपये आहेत.मग माझं विचारचक्र सुरु झालं.एवढी मोठी मदत उभी करणं गरजेचं आहे. गरज हीच शोधाची जननी असते आणि माझ्यासमोर दुर्मिळातील दुर्मिळ दातृत्वगुण असणारे,मदतीसाठी सदैव तत्पर असणारे,सर्वांसाठी उपलब्ध असणारे,दुसऱ्यांच्या दुःखात धावून जाणारे आणि तमाम



महाराष्ट्राचे आरोग्यदूत असणारे आणि 400 ते 500 लहान मुलांच्या हृदयाचे विनामुल्य ऑपरेशन करुन जीवनदान देणारे...अमोघ वकृत्व,अफाट कर्तुत्व,अजोड नेतृत्व,अजेय शूरत्व आणि असीम दातृत्व या पंच गुणांचा सुरेख संगम असलेले पंचमदा म्हणजेच कल्याण लोकसभा मतदार संघांचे लाडके,लोकप्रिय व लोकहितवादी खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे साहेब होय....! डॉ.श्रीकांत शिंदे साहेब म्हणजे रुग्णांचे तारणहार,रुग्णांचे मदतगार,रुग्णांना अत्युचं दर्जाची सेवा,मदत व सुविधा उपलब्ध करुन देणारे पृथ्वी तलावरील साक्षात देवदूतच....! मी क्षणाचाही विलंब न लावता त्या पालकांना म्हटलं आपण खासदार श्रीकांत शिंदे साहेबांकडे जाऊ या साहेबांना आपली सर्व परिस्थिती व व्यथा समजावून सांगू साहेब नक्की त्याच्यातून काहीतरी मार्ग काढतील हा माझा आत्मविश्वास होता कारण एक शिवसैनिक म्हणून व शिवसेनेचा विधानसभा समन्वयक म्हणून साहेबांची काम करण्याची पद्धती, प्रश्न समजून घेण्याची आणि प्रश्न सोडविण्याची क्षमता मी अनेकवेळा अनुभवली आहे. साहेबांनी दिलेला शब्द कधी मोडला नाही आणि लिहिलेला शब्द कधी खोडला नाही. याची जाणीव असल्यामुळेच मी एक -दोन दिवसानंतर कालहरण न करता मी साहेबांचे स्वीय सहाय्यक श्री.अभिजीत दरेकार आणि श्री. प्राजक्त झावरे पाटील यांना फोन केले त्यांनी सांगितलं की साहेब कल्याण पूर्वला येणार आहेत तुम्ही त्या पालकांना घेऊन या मी लगेच पालकांना फोन केला आपल्याला माननीय खासदार श्रीकांत शिंदे साहेबांनी बोलावलेले आहे सर्व मेडिकल फाईल सोबत घेऊन या साहेबांचा दरबार म्हटला की कल्याण लोकसभा नव्हे तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून वेगवेगळ्या समस्यांनी ग्रासलेले,त्रासलेले नागरिक त्या ठिकाणी येऊन आपल्या समस्या व प्रश्न घेऊन येतात आणि सोडवून निघून जातात. येताना नागरिकांच्या चेहऱ्यावर दुःख व चिंता असते परंतु जाताना मात्र प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एक आनंदाचे हसू व समाधान असतं त्या दिवशी साहेबांचा दरबार होता हजारोंच्या संख्येने नागरिक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले होते परंतु हा विषय थोडा सेन्सिटिव्ह असल्याने मी पोचल्यानंतर अभिजीत दरेकरांना फोन केला व विनंती केली त्यांनी लगेच साहेबांची भेट घडवून दिली साहेबांसोबत आई-वडील त्या मुलीची गंभीर आजाराविषयी माहिती देताना आई-वडिलांना रडू कोसळले प्रथमता साहेबांनी त्यांना शांत व्हा. धीर धरा.पाणी घ्या.आपण मार्ग काढू नंतर साहेबांनी त्या 4 वर्षाच्या चिमुरडीच्या आजारपणा विषयी सखोल माहिती घेतली व मुलीच्या डोक्यावरून मायेचा व प्रेमाचा हात फिरवला. त्यामुळे मुलगी त्यांच्याकडे खूप आशेने बघत होती साहेबांनी क्षणाचाही विचार न करता अभिजीतला सांगितलं की आपल्याला यांना मदत करायची आहे, काय असेल ती सगळी माहिती घे आणि यांना त्वरीत बंगल्यावर बोलावून घे.आम्ही भेट घेऊन घरी निघून आलो. दुसऱ्या दिवशी अभिजीत चा फोन आला आणि सांगितलं भामरे सर पालकांना व मुलीला घेऊन तुम्ही बंगल्यावर या मुलीला आणि आई-वडिलांना घेऊन बंगल्यावर गेलो बंगल्यावर सुद्धा अनेकांची त्या ठिकाणी भेटण्याची गर्दी होती.अभिजीतला कळलं की आम्ही आलो आहोत.अभिजितने क्षणाचाही विलंब न करता आम्हाला बोलवून घेतलं आणि सांगितले की श्रीकांत शिंदे साहेबांचा निरोप आहे की या चिमूरडीच्या आजारपणाच्या उपचारासाठी आपल्याला सर्व प्रकारची मदत करायची आहे. सोमवारी तुम्ही कोकिलाबेन हॉस्पिटल, मुंबई येथे जा.डॉक्टरांना ट्रीटमेंट सुरु करायला सांगा आणि हॉस्पिटलचा खाते क्रमांक मला पाठवा.आपण संपुर्ण 15/20 लाखाची मदत करु.निश्चिन्त रहा. आम्हाला आणि पालकांना वाटलं होत की मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्री सहायता निधी मधून दोन-चार लाख रुपये देतील किंवा इतर शासकीय मदत करतील परंतु अभिजीत बोलले की संपुर्ण 15/20 लाख रुपये खर्चाची जबाबदारी खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे साहेब साहेब उचलली आहे.हे वाक्य ऐकून माझ्या आणि पालकांच्या आनंदात पारावार उरला नाही. आई-वडील दोघांच्या आणि माझ्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले...मात्र डोळ्यात आलेले अश्रू हे आनंदाचे,समाधानाचे,जीव्हाळ्याचे, प्रेमाचे,स्नेहाचे आणि आपुलकीचे होते...!

एक ऋणानुबंध साहेबांनी त्या ठिकाणी जपला.एक सुंदर नातं जुळलं आणि समाधान आणि आनंदाची शिदोरी घेऊन आम्ही खाली उतरलो. आनंदाने सुखावलेल्या चेहऱ्याने साहेबांना त्या आई-वडिलांनी मनोमनी शुभेच्छा दिल्या

काही माणसं ताडामाडा प्रमाणे उंच वाढवून स्वतःचा अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात आणि काही माणसं मात्र वटवृक्षाप्रमाणे वाढून दुसऱ्यांना सावली,आधार, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी,ऋणानुबंध,स्नेह,देण्याचा प्रयत्न करतात ते वटवृक्ष म्हणजेच खासदार श्रीकांत शिंदे साहेब आणि मलाही आत्मसुखाचा, आत्मसमाधानाचा व आत्मानंदाचा सुखद अनुभव घेता आला. आणि माझ्या मुखातून सहज एक शब्द बाहेर पडला तो म्हणजे होय,माणसात देव दिसला, देव अनुभवला डॉ.श्रीकांत शिंदे साहेब यांच्या रुपाने (आपण सुद्धा परमेश्वराकडे एकच प्रार्थना करूया की या चार वर्षाच्या चिमूरडीचे उपचार होऊन तिच्या तब्येतीत सुधारणा होऊ दे त्या मुलीला आई भवानी उदंड आयुष्य देवो कल्याण लोकसभेचे खासदार ठिकाणी शिंदे साहेब यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा आई भवानी त्यांना उदंड आयुष्य देवो

**- प्रशांत तुकाराम भामरे**
**शिवसेना विधानसभा**
**समन्वयक कल्याण पश्चिम**
**9029336333**

# भविष्यवेध



**शुक्रवार**
**०६ फेब्रुवारी २०२६**

**मेष**
कामाचं ओझं वाढू शकतं, परंतु तुमच्या कष्टांमुळे आणि समर्पणामुळे तुम्ही ते वेळेत पूर्ण करू शकाल. आर्थिकदृष्ट्या तुम्हाला अधिक नियोजन करणे आवश्यक आहे.

**वृषभ**
अनावश्यक खर्च नियंत्रणात ठेवणे गरजेचे आहे. कुटुंबातील एखाद्या सदस्याशी मतभेद होऊ शकतात, त्यामुळे बोलताना संयम बाळगा. प्रगतीपूर्ण दिवस असेल.

**मिथुन**
आरोग्याबाबत थोडी काळजी घेणे आवश्यक आहे, कारण स्नायू दुखण्याची समस्या होऊ शकते.मित्रांसोबत संध्याकाळी बाहेर जाणे ताजेतवाने करणारे ठरेल.

**कर्क**
आपल्या व्यस्त कामाच्या वेळापत्रकात आज आपल्याला कुटुंब आणि पालकांसाठी वेळ काढावा लागेल. कोणालाही पैसे उधार देणे टाळा. मानसिक शांती मिळेल.

**सिंह**
व्यावसायिकांना मोठा व्यावसायिक करार मिळू शकतो, ज्यामुळे भविष्यात आर्थिक वाढ होईल. समाजात तुमची प्रतिष्ठा वाढेल, आणि लोक सल्ला घेण्यास उत्सुक होतील.

**कन्या**
जोडीदाराशी संबंध अधिक सौहार्दपूर्ण होतील, जर कोणतीही कायदेशीर बाब प्रलंबित असेल, तर त्यात यश मिळण्याची अनुकूल शक्यता आहे.

**तुळ**
तुमचे आरोग्य चांगले राहील. डोळ्यांची काळजी घेणे आवश्यक आहे. नोकरी करणाऱ्यांसाठी आज पगारवाढ किंवा बढतीची अनुकूल संधी आहे.

**वृश्चिक**
अडकलेली कामे गती घेतील. नोकरीत लोकांना कार्यालयात नवीन जबाबदाऱ्या सोपवल्या जाऊ शकतात, ज्या तुमच्या करिअरसाठी एक मैलाचा दगड ठरेल.

**धनु**
आर्थिक लाभाच्या चांगल्या शक्यता आहेत, आणि तुम्ही जुना कर्ज फेडण्यात यशस्वी व्हाल. नवीन परिचितांशी होणाऱ्या भेटी भविष्यात लाभदायक ठरतील.

**मकर**
विद्यार्थ्यांसाठी अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी हा उत्तम काळ आहे. कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील, आणि धार्मिक कार्यक्रमात सहभागी होऊ शकता.

**कुंभ**
कामामध्ये सहकाऱ्यांशी संबंध सांभाळा. वादात अडकू नका किंवा कोणाशीही भांडण करू नका. आर्थिक व्यवहारात विशेषतः सावधगिरी बाळगा.

**मीन**
ज्येष्ठ सदस्याच्या आरोग्याबद्दल काळजी वाटू शकते, त्यांना पुरेशी काळजी घेण्याची खात्री करा. शारीरिकदृष्ट्या थकवा जाणवत असेल, तर विश्रांती घेणे श्रेयस्कर आहे.

# नाल्यातील सांडपाणी नदीत सोडल्याने संताप

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर** : बदलापुरात नाल्यांमधले सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता थेट नदीत सोडले जात असल्याबाबत माजी नगराध्यक्ष राजन घोरपडे यांनी संताप व्यक्त केला आहे. याच मुद्द्यावरून मुंबई उच्च न्यायालयाने बदलापूर पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांवर ताशेरे ओढले होते.उल्हास नदीत सांडपाणी सोडले जात असल्याबाबत उच्च न्यायालयाने विचारणा केली असता अनधिकृत बांधकामे वाढल्याने सांडपाणी नदीत जात असल्याचा शोध पालिकेने लावला होता. त्यावर न्यायालयाने बांधकामांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

मात्र अजूनही दूषित, नाल्यांचे पाणी थेट नदीत जात असून त्यास सांडपाणी प्रक्रिया केंद्र नसणे, हे कारणीभूत असल्याचे घोरपडे यांनी सांगितले. बदलापूर पालिका प्रशासनाने त्याकडे लक्ष द्यावे. न्यायालयाची दिशाभूल करू नये, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाने तातडीने उपाय योजण्याची मागणी होत आहे.

# प्रशासक राजवटीचे लेखापरीक्षण

## उपमहापौर दशरथ भगत यांचे संकेत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ५**

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिकेवर तब्बल सहा वर्षांनंतर लोकप्रतिनिधींची सत्ता स्थापन झाली असून, प्रशासक राजवटीत झालेल्या विकासकामांचे लेखापरीक्षण (ऑडिट) केले तर त्यात गैर काय, असा सवाल नवनिर्वाचित उपमहापौर दशरथ भगत यांनी उपस्थित केला आहे.

वनमंत्री गणेश नाईक यांनी याआधीच सभागृहातील कामांची पडताळणी केली जाईल, असे जाहीरपणे सांगितले होते. त्याच भूमिकेचा पुनरुच्चार भगत यांनी केल्याने पहिल्याच दिवशी शिंदे गटातील नेत्यांमध्ये चर्चेला तोंड फुटले आहे.



नवी मुंबई महापालिकेतील विविध कामांवरून वनमंत्री गणेश नाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या नेत्यांवर यापूर्वी अनेकदा टीका केली आहे. या टीकेमुळे दोन्ही गटांतील संबंध ताणले गेले असून, याच पार्श्वभूमीवर नवी मुंबई महापालिकेत महायुतीखाली निवडणूक होऊ शकली नाही. शिंदे यांच्या आदेशाने होत असलेल्या कामांवर नाईक यांनी वारंवार प्रश्न उपस्थित करत पाणीचोरीसह विविध सुविधांमध्ये वाटमारी होत असल्याचा आरोप केला आहे. उपमहापौरपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर पत्रकारांशी बोलताना दशरथ भगत यांनी, सभागृहात याआधी झालेल्या कामांची तपासणी करणे ही चुकीची बाब नसल्याचे स्पष्ट केले. जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी जर विकासकामांची पडताळणी करीत असतील, तर ती जनतेचीच मागणी असल्याचे त्यांनी सांगितले. योग्य पद्धतीने काम झाले असेल, तर कोणालाही घाबरण्याचे कारण नाही, असेही भगत यांनी नमूद केले.

# राष्ट्रीय किशोरवयीन आरोग्य समितीच्या अध्यक्षपदी डॉ. सुप्रिया आरवरी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**शरद भसाळे ■ दि.5**

**भिवंडी :** प्रसूती आणि स्त्रीरोग तज्ज्ञांच्या सर्वोच्च राष्ट्रीय संस्था असलेल्या फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रीक अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया (FOGSI) या किशोरवयीन आरोग्य समितीच्या अध्यक्षा म्हणून भिवंडीतील स्त्रीरोग तज्ञ डॉ.सुप्रिया आरवारी यांची निवड झाली आहे. त्यामुळे ठाणे जिल्हास्तरावर मान्यवर डॉक्टरांकडून त्याचे अभिनंदन केले जात आहे.संस्थेचा गणमान्य पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. हा कार्यक्रम दिल्ली येथे संपन्न झाला. भिवंडी सारख्या एका छोट्या शहरातून सुरुवात करून माझ्या निवडणूक वर्षात बिनविरोध निवडली जाणारी एकमेव समिती सदस्य होण्यापर्यंतचा हा प्रवास खूप समाधानकारक राहिला आहे. किशोरवयीन आरोग्य आणि सामाजिक कल्याणाच्या क्षेत्रात काम करण्याची पहिली संधी दिल्याबद्दल मी माझ्या "मातृभूमी भिवंडी" आणि "माझ्या मातृसंस्था - ठाणे ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटी" यांच्या सह मला मार्गदर्शन करणाऱ्या सर्व ज्येष्ठांचे मनःपूर्वक आभार मानते.ही संपूर्ण भारतातील सदस्यांची स्त्रीरोग तज्ञांची मुख्य राष्ट्रीय संस्था आहे. मी किशोरवयीन आरोग्यासाठी राष्ट्रीय अध्यक्षा म्हणून काम करणार आहे, हा माझ्यासाठी खूप मोठा सन्मान आहे,अशी प्रतिक्रिया डॉ.सुप्रिया आरवरी यांनी पदभार स्वीकारताना व्यक्त केली.




# रुग्णवाहिका वेळेत न आल्याने कसाऱ्यात तरुणीची फरफट

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ४**

**कसारा :** रुग्णवाहिका वेळेत न मिळाल्यामुळे चक्कर येऊन खाली कोसळलेल्या तरुणीची फरफट झाल्याची घटना मंगळवारी कसारा रेल्वे स्थानकाजवळ घडली. कसारा स्थानक परिसरात एका तरुणीला अचानक चक्कर येऊन ती खाली कोसळली. त्यानंतर तिच्या तोंडातून फेस येऊ लागल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. ही बाब लक्षात येताच ग्रामस्थांनी तत्काळ धाव घेऊन तरुणीला गावातील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र तिची प्रकृती अधिक खालावल्याने डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी शहापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला. तरुणीला उपजिल्हा रुग्णालयात नेण्यासाठी स्थानिक व्यापारी ऋषभ अग्रवाल यांनी रुग्णवाहिका हेल्पलाइनवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र तब्बल चार वेळा फोन करूनही प्रतिसाद मिळाला नाही, अशी माहिती त्यांनी दिली. रुग्णाची स्थिती गंभीर असल्याने अखेर वेळ न दवडता खासगी वाहनाची व्यवस्था करून त्या तरुणीला शहापूरच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे तिच्यावर उपचार सुरू करण्यात आले. आपत्कालीन सेवेतील रुग्णवाहिका वेळेत न मिळाल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून अशा प्रसंगी तात्काळ प्रतिसाद मिळणे आवश्यक असल्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

# कर बुडव्यांविरोधात केडीएमसीची धडक मोहीम

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ५**

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने मालमत्ता कर थकबाकीदारांविरोधात प्रभावी कारवाई सुरू केली असून, करचुकवेगिरी करणाऱ्यांवर जप्ती व नळजोडणी खंडित करण्याची विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी मालमत्ता कराची देयके वितरित करण्यात आली असून, वेळेत कर भरण्याचे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे. आगाऊ मालमत्ता कर भरणाऱ्या मिळकतधारकांना ऑगस्ट २०२५ पर्यंत ५ टक्के, तर सप्टेंबर २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत ४ टक्के सवलतीचा लाभ देण्यात येणार आहे. याबाबत एसएमएस संदेश तसेच जप्ती वॉरंटपूर्व अंतिम सूचनेद्वारे वारंवार माहिती देऊनही प्रतिसाद न देणाऱ्या थकबाकीदारांविरोधात कठोर पावले उचलण्यात येत आहेत.

महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आजमितीस सुमारे २३६ मालमत्ता सील करण्यात आल्या असून ३९ नळजोडण्या खंडित करण्यात आल्या आहेत. ही कारवाई पुढील काळात आणखी तीव्र केली जाणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### ■ ऑनलाईन भरणा सुविधा

नागरिकांना मालमत्ता कर भरणे सुलभ व्हावे यासाठी www.kdmc.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत प्रत्येक शनिवार व रविवार या सुट्टीच्या दिवशी नागरी सुविधा केंद्र सुरू ठेवण्यात येणार आहेत. ऑनलाईन पद्धतीने कर भरल्यास अतिरिक्त २ टक्के सवलतीचाही लाभ मिळणार आहे.

थकीत मालमत्ता कर वेळेत न भरल्यास प्रतिमाह २ टक्के दंडात्मक व्याज, नळजोडणी खंडित करणे तसेच जप्ती अथवा अटकावणीसारखी कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत देण्यात आला आहे. मालमत्ता कर भरणे ही प्रत्येक जबाबदार नागरिकाची ओळख असून, आपल्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी वेळेत कर भरण्याचे आवाहन महापालिका उपआयुक्त बाळासाहेब चव्हाण यांनी केले आहे.



# उल्हासनगरात आज दोन तास पाणीपुरवठा बंद

## जांभूळ केंद्राचे पंपिंग बंद ■ वीज कंपनीच्या देखभाल कामाचा फटका

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ५**

**उल्हासनगर :** पडघा येथील २२० केव्ही वीजवाहिनीच्या देखभाल व दुरुस्ती कामामुळे शहरातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार आहे. शुक्रवारी (दि. ६) सकाळी १० ते दुपारी १२ या कालावधीत वीजपुरवठा खंडित राहणार असल्याने एमआयडीसीतील जांभूळ पाणी केंद्राचे पंपिंग पूर्णतः बंद राहील. परिणामी, शहरातील पाणीपुरवठ्याची साखळी विस्कळित होऊन नागरिकांना कमी दाबाने पाणी मिळणार आहे.

महाराष्ट्र राज्य वीज प्रसारण कंपनीकडून २२० केव्ही पडघा ईएचव्ही लाईनवर तातडीचे देखभाल-दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. या काळात जांभूळ केंद्रातील पंपिंग यंत्रणा ठप्प राहणार असून, वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर पंपिंग प्रक्रिया पुन्हा सुरू केली जाणार आहे. मात्र, यंत्रणा पूर्ववत होण्यासाठी वेळ लागत असल्याने दिवसभर पाणीपुरवठा कमी दाबाने होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

विशेषतः पाले टॅपिंग व फॉरेस्ट नाका टॅपिंग परिसरातील नागरिकांना पाण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागू शकतो. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी गुरुवारीच पाण्याचा पुरेसा साठा करून ठेवावा व शुक्रवारी पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असे आवाहन पालिकेचे पाणीपुरवठा अधिकारी अशोक घुले यांनी केले आहे. तसेच, नियोजित वीज बंदीमुळे काही काळ पंपिंग बंद राहील व त्यानंतरही काही तास पाणीपुरवठा कमी दाबानेच राहील, त्यामुळे नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पालिकेचे जनसंपर्क अधिकारी अजय साबळे यांनी केले आहे.

# रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती गणांसाठी आज मतदान

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ● प्रतिनिधी / दि. ५**

रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ गट आणि ११८ पंचायत समिती गणांसाठी शनिवारी मतदान होत आहे. जिल्ह्यातील १५ तालुक्यांत २ हजार ३२३ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. यासाठी १७ लाख ३८१ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. जिल्हा परिषदेच्या ५९ गटांसाठी १७३ तर ११८ पंचायत समित्यांमध्ये ३२९ उमेदवार नशीब अजमावत आहेत. मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून प्रत्येक मतदान केंद्रावर पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्यात येणार आहे. रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी प्रशासकीय तयारी पूर्ण झाली आहे. मतदान यादी, मतदार केंद्रे निश्चित झाली आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये १७ लाख ३८१ मतदार आहेत. त्यात ८ लाख ५७ हजार ९ महिला आणि ८ लाख ४६ हजार ३४७ पुरुष तसेच इतर २५ मतदारांचा समावेश आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर एक निवडणूक अधिकारी तसेच तीन कर्मचारी व एक शिपाई नेमण्यात आला आहे.

# पालघर जिल्ह्यात आरोग्य यंत्रणेचा बोजवारा

## दशक लोटले तरी जैसे थे परिस्थिती

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ५**

**पालघर :** जिल्हा रुग्णालय, ट्रॉमा केअर सेंटर, महिला व बाल रुग्णालय तसेच आदिवासी भागांसाठी अत्यावश्यक जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा येथील रुग्णालयांचे बळकटीकरण होणे अपेक्षित असतानाही जिल्हा स्थापन होऊन दशक उलटले तरी परिस्थितीत फारसा बदल झालेला नसल्याची कबुली खुद्द पालकमंत्री गणेश नाईक यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत दिली आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

पालघर जिल्ह्याला आजही स्वतंत्र आणि सुसज्ज जिल्हा रुग्णालय उपलब्ध नाही. गंभीर आजार, अपघात, प्रसूती किंवा तातडीच्या उपचारांसाठी रुग्णांना गुजरात, ठाणे किंवा मुंबईकडे धाव घ्यावी लागत आहे. वेळेवर उपचार न मिळाल्याने अनेक वेळा रुग्णांच्या जीवावर बेतत असून, वेळ, पैसा आणि अंतर यामुळे सामान्य नागरिक मोठ्या अडचणीत सापडत आहेत. जिल्ह्याचा मोठा भाग ग्रामीण व आदिवासी असल्याने येथील नागरिकांसाठी सरकारी आरोग्य यंत्रणाच एकमेव आधार आहे. मात्र, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ग्रामीण रुग्णालयांमध्ये पुरेसे मनुष्यबळ नसल्याने रुग्णांना खासगी रुग्णालयांचा महागडा पर्याय स्वीकारावा लागत आहे.

जिल्ह्यातील अनेक महत्त्वाचे आरोग्य प्रकल्प आजही रखडलेले आहेत. जिल्हा रुग्णालयाची इमारत उभी असतानाही ते पूर्ण कार्यक्षमतेने सुरू करण्यासाठी सुमारे १८८ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असून, निधीचा प्रस्ताव अजूनही लालफितीत अडकलेला आहे. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गालगत उभारलेले ट्रॉमा केअर सेंटर इमारत पूर्ण असूनही निधीअभावी निष्क्रिय अवस्थेत आहे. तसेच, महिला व बालकांसाठी स्वतंत्र रुग्णालय उभारण्याच्या घोषणा वारंवार होऊनही प्रत्यक्षात हे रुग्णालय अस्तित्वात आलेले नाही.

या पार्श्वभूमीवर ग्रामीण व आदिवासी भागातील गरोदर माता, नवजात बालके आणि लहान मुलांना आवश्यक तज्ज्ञ उपचार मिळत नसल्याने आरोग्य व्यवस्थेची गंभीर अवस्था पुन्हा एकदा समोर आली आहे. जिल्ह्याच्या आरोग्य सुविधांचे बळकटीकरण कधी होणार, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### इतर जिल्ह्यात उपचारांची नामुष्की

आदिवासीबहुल जव्हार, मोखाडा तालुक्यातील रुग्णालयाची स्थिती तर अधिकच चिंताजनक आहे. डॉक्टरांची कमतरता, अपुरी साधनसामग्री, औषधांचा तुटवडा, पायाभूत सुविधांच्या अभावामुळे रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रे केवळ नावापुरतीच उरली आहेत. पावसाळ्यात दुर्गम भागातील रस्ते खराब झाल्याने रुग्णांना रुग्णालयापर्यंत पोहोचणेही कठीण जाते. त्यातच रुग्णालयात रुग्ण, गरोदर माता उपचारासाठी दाखल केल्यानंतर काहीना नाशिक येथे हलविण्याचा सल्ला दिला जातो. त्यामुळे आरोगय सुविधांअभावी रुग्णांना इतर जिल्ह्यात नेण्याची नामुष्की ओढवते.

# शहापुर : चेरपोली डी-मार्टमध्ये भूमिपुत्रांनाच रोजगार द्या

## ठाकरे गट तालुकाप्रमुख कुलदीप धानके यांची मागणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ५**

**शहापूर : मुंबई-नाशिक महामार्गालगत शहापूर तालुक्यातील चेरपोली गावाच्या हद्दीत लवकरच डी-मार्ट सुपर मार्केट सुरू होणार असून, या प्रकल्पामधून स्थानिक बेरोजगार तरुणांना रोजगाराची संधी देण्यात यावी, अशी ठाम मागणी ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख कुलदीप धानके यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

चेरपोली परिसरात उभा राहत असलेला डी-मार्ट हा मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करणारा प्रकल्प असून, त्यातून विविध स्तरांवरील नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत. मात्र, शहापूर तालुक्यात सुशिक्षित असूनही बेरोजगार असलेल्या तरुणांची संख्या लक्षणीय आहे. अशा परिस्थितीत स्थानिक भूमीवर उभ्या राहणाऱ्या प्रकल्पात स्थानिक युवकांनाच रोजगार मिळणे हा त्यांचा नैसर्गिक हक्क असल्याचे कुलदीप धानके यांनी स्पष्ट केले.




डी-मार्ट व्यवस्थापनाने भरती प्रक्रिया राबविताना तालुक्यातील स्थानिक उमेदवारांना किमान ८० टक्के प्राधान्य द्यावे, अशी ठोस मागणी करण्यात आली आहे. तसेच भरती प्रक्रिया पूर्णतः पारदर्शक ठेवून चेरपोलीसह आजूबाजूच्या गावांतील व ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील तरुणांचा प्राधान्याने विचार करावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यासोबतच प्रशासनाने डी-मार्ट व्यवस्थापनासोबत तातडीने संयुक्त बैठक आयोजित करून स्थानिक बेरोजगार तरुणांना न्याय मिळण्यासाठी स्पष्ट आणि बंधनकारक सूचना द्याव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे. स्थानिक युवकांना डावलून बाहेरील उमेदवारांना संधी दिल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा अप्रत्यक्ष इशाराही यावेळी देण्यात आला.

या निवेदनावेळी कुलदीप धानके यांच्यासह मिलिंद देशमुख, गणेश अवसरे, राजेश फर्डे, सुनील भेरे, विजयसिंह राजपूत आदी पदाधिकारी उपस्थित होते. सर्वांनी तहसीलदार परमेश्वर कासुळे यांची भेट घेऊन स्थानिकांच्या रोजगाराच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली.

# सुरक्षित प्रभागासाठी युवासेनेच्या पुढाकारातून सीसीटीव्ही यंत्रणा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ५**

**कल्याण :** नागरिकांना स्वच्छ आणि सुंदर प्रभागासोबतच सुरक्षित प्रभागाची देखील आवश्यकता असून यासाठी युवासेनेतर्फे पुढाकार घेण्यात आला आहे. युवासेना डोंबिवली शहर अध्यक्ष सागर जेधे यांनी आपल्या प्रभागात नागरिकांच्या सुरक्षेसाठी विविध ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यास प्रारंभ केला आहे. कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त या उपक्रमाची सुरवात करण्यात आली आहे.

प्रभागाला अधिक स्वच्छ, सुरक्षित व शिस्तबद्ध बनवण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व स्वच्छतेसाठी डोंबिवलीमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येत आहेत. यामध्ये डोंबिवलीतील बॅडमिंटन कोर्टच्या जवळ - जय मल्हार सोसायटी शेजारी, डी.एन.सी. शाळेच्या पाठीमागे - ट्रान्सफॉर्मरजवळ, देवकी निवास बिल्डिंगजवळ, अंबर कॅसल बिल्डिंग - गेटच्या बाजूला, नील पद्मा हॉलजवळ,रॉयल वैलनसिया सोसायटी शेजारी आदी ठिकाणांचा समावेश आहे.

प्रभागातील सर्व नागरिकांनी आपला प्रभाग स्वच्छ, सुंदर व सुव्यवस्थित ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन युवासेना डोंबिवली शहर अध्यक्ष सागर जेधे यांनी केले आहे.

## जाहीर सूचना

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की,

मौजे सोनारआळी, ता. मुरबाड, जि. ठाणे, नगरपंचायत मुरबाड हद्दीत असलेली मालमत्ता क्रमांक ५७२/१०३ ही मालमत्ता श्री. रोहन सुरेश तेलवणे, रा. जय श्री कृष्ण बिल्डींग, छत्रपती संभाजी महाराज नगर, मुरबाड, ता. मुरबाड, जि. ठाणे यांची मालकी हक्काची असून सदर मालमत्ता त्यांनी श्री. जयवंत अशोक भरनुके, रा. मामनोली, ता. कल्याण, जि. ठाणे यांना कायमस्वरूपी विक्री केलेली आहे.

सदर व्यवहाराचा संमतीपत्र दिनांक ०४/०२/२०२६ रोजी मे. मा. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड यांचे समोर निष्पादित झालेला असून, संपूर्ण मोबदला अदा करण्यात आलेला आहे व मालमत्तेचा निर्विवाद व खुला ताबा देण्यात आलेला आहे. याआधारे सदर मालमत्ता नगरपंचायत मुरबाड दप्तरी, घरपट्टी, नळपट्टी व असेसमेंटमध्ये श्री. जयवंत अशोक भरनुके यांच्या नावे नोंद करण्याची प्रक्रिया प्रस्तावित आहे.

तरी या मालमत्तेबाबत कोणाच्याही काही हरकती, दावे, आक्षेप, हक्क, तक्रारी अथवा आडवे येणारे अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात आवश्यक कागदपत्रांसह कळवावे.

ठरावीक मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मालमत्तेबाबत कोणाचाही दावा नाही असे समजून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**हरकत नोंदविण्याचा पत्ता :**
**श्री. जयवंत अशोक भरनुके**
**रा. मामनोली, ता. कल्याण, जि. ठाणे**
**दिनांक : 05/02/2026**

## अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ
## विभाग-विद्युत विभाग
## जाहीर सूचना

**अंबरनाथ नगरपरिषद कार्यक्षेत्रातील विद्यमान एलईडी पथदिवे देखभाल दुरुस्ती करीता तक्रार नोंदविणे करीता संपर्क क्रमांक प्रसिद्ध करणेबाबत**

अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, शहरातील अंबरनाथ नगरपरिषद द्वारे बसविणेत आलेल्या, नगरपरिषद मालकीच्या स्ट्रीट लाईट बंद / नादुरुस्त असल्यास किंवा पथदिव्यांबाबत काही तक्रार असल्यास, त्याबाबत तक्रार नोंद करण्यासाठी खालील दिलेल्या संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा.

**तक्रार नोंदविताना खालील माहिती देणे आवश्यक आहे -**
परिसर / विभागाचे नाव-खांब क्रमांक (शक्य असल्यास) तक्रारीचा संक्षिप्त तपशील-तक्रारदाराचे नाव व संपर्क क्रमांक

**तक्रार नोंदणीसाठी संपर्क क्रमांक:**
+918097019595
M/s BAC Infratech Pvt Ltd. and
M/s Vinci Global Pvt Ltd. (JV).

नागरिकांनी सहकार्य करावे, जेणेकरून नगरपरिषदेस पथदिव्यांची दुरुस्ती वेळेत करण्यास सहकार्य होवून शहरातील पथदिवे व्यवस्था अखंडितपणे चालू ठेवणेस शक्य होईल.

**मुख्याधिकारी,**
**अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ**



# एमआयडीसी मिलापनगरमध्ये वाहन शिकताना चारचाकी अपघात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** डोंबिवली एमआयडीसी निवासी, मिलापनगर मधील गणेश विसर्जन तलाव जवळ गुरुवारी सायंकाळी साडे पाच दरम्यान चारचाकी गाडी शिकत असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हि गाडी रस्त्याच्या बाजूला नविन बांधलेल्या गटारात घुसली. त्यामुळे गटाराचे आणि महावितरण खांबाच्या आधारासाठी असलेल्या स्टे केबलचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे. हि गाडी एक युवती चालवत होती. त्या युवतीचा बाजूला बसून एक व्यक्ती तीला वाहन शिकवत असल्याचे समजले आहे.या अपघात वेळी तेथून सुदैवाने कोणी जात नसल्याने कोणतीही दुर्घटना घडली नाही. क्रेनच्या सहाय्याने हि कार बाहेर काढण्यात आली. निवासी विभागात आता सिमेंट कॉंक्रिट रोड झाले असल्याने व अंतर्गत रस्त्यावर जास्त वाहतूक नसल्याने वाहने शिकण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे असे अपघात अधूनमधून येथे होत असतात. यावर वेळीच प्रशासनाने पायबंद घालावा अशी मागणी स्थानिक रहिवाशांकडून होत आहे.



# शौचालयासाठी आकारण्यात येतेय वाढीव रक्कम

## नागरिकांच्या मुलभूत सुविधेचा प्रश्न ऐरणीवर



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील सूचक नाका परिसरात असलेल्या केडीएमसीच्या सार्वजनिक शौचालयातून वाढीव रक्कम आकारण्यात येत असल्याने नागरिकांच्या मुलभूत सुविधेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

केडीएमसी क्षेत्रातील सूचक नाका, रामनगर येथे झोपडपट्टी परिसर असून या ठिकाणी नागरिकांच्या वापराकरीता महापालिकेच्या वतीने सार्वजनिक शौचालय बांधण्यात आले आहे. या शौचालयाच्या साफसफाईच्या उद्देशाने महिला बचतगटाने काही वर्षांपासून हे शौचालय ताब्यात घेतले आहे. परंतु काही महिन्यांपासून मासिक फी बंद करून मनमानी पद्धतीने प्रत्येक घर ६० रुपये न घेता, १०० रुपये प्रत्येक घरामागे द्या अन्यथा प्रत्येक वेळी ५ रुपये देण्याची मागणी होत आहे.

सूचकनाका हा परिसर संपूर्ण झोपडपट्टीचा असून येथील नागरिकांची परीस्थित हालाकीची आहे. अशा प्रकारामुळे नागरिकांना मानसिक त्रास सहन करावा लागत असून महापालिकेने हे शौचालय महिला बचत गटाच्या ताब्यातून काढून घेऊन स्वतः चालवावे अशी मागणी स्थानिक नागरिक करत असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते मनोज वाघमारे यांनी दिली.

# जिल्हास्तरीय लेझीम स्पर्धेत मामणोली शाळा ठाणे जिल्ह्यात प्रथम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : दिनांक 21जानेवारी 2026 रोजी ऑल सेंट हायस्कूल भिवंडी येथे ठाणे जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. रणजीत यादव साहेब, शिक्षणाधिकारी मा. बाळासाहेब राक्षे साहेब , क्रीडा प्रमुख तथा शिक्षण विस्ताराधिकारी मा. आशिष झुंजारराव ,भिवंडीचे गटशिक्षण अधिकारी मा. श्री संजय अस्वले, शहापूरचे गट शिक्षणाधिकारी,मा. श्री हिराजी वेखंडे, कल्याणच्या शिक्षण विस्ताराधिकारी मा. विद्या नाईकवडी , विस्तार अधिकारी मा राम विशे या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थित पार पडलेल्या स्पर्धेत. जिल्हा परिषद केंद्र शाळा मामणोली शाळेने लेझीम स्पर्धेत ठाणे जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान मिळवून कल्याण तालुक्याची शान उंचावली या बद्दल कौतुकाचा वर्षाव होत आहे,

मामणोली केंद्राचे केंद्रप्रमुख व शाळेचे मुख्याध्यापक श्री अनंत केदार सर यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा शिक्षक श्री पुंडलिक धुमाळ, सहशिक्षक सौ शुभांगी विशे, श्री संतोष भागवत, श्री अलंकार हरड, सौ भारती पाटील, श्री विजय गोडांबे, कु.दीपाली खंडागळे, कु.ललिता कोर,सौ संजना चौधरी, श्रीम वैशाली शिंदे या शिक्षकांनीया साठी विशेष मेहनत घेतली.

हे यश संपादन केल्याबद्दल गटविकास अधिकारी मा. गवारी साहेब, गटशिक्षणाधिकारी मा. सुनीता मोटघरे मॅडम, शिक्षण विस्तार अधिकारी विद्या नाईकवाडी मॅडम, सरपंच श्री तुषार कोर, माजी सरपंच श्री संतोष भरनुके,smc अध्यक्ष श्री मंगेश कोर, उपसरपंच श्री कल्पेश कोर,ग्रामसेविका श्रीम.दीपमाला हुले ,पत्रकार श्री भरत दळवी, श्री जयवंत कोर, श्री अनंता कोर, श्री मनोहर कोर, श्री दिलीप बांगर, श्री लक्ष्मण कोर, शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, ग्रामस्थ केंद्रातील सर्व शाळांचे शिक्षक यांनी शाळेचे कौतुक करून अभिनंदन केले,



जिल्हास्तरीय लेझीम विजेता संघ मामणोली

**शाळा मामणोलीचे उत्तुग यश -पात्र विद्यार्थी -**

1) रूदया जयवंत कोर 5वी
2) स्वरा दिलीप बांगर 7वी
3) वेदिका हौशीराम कोर 7वी
4) वेदिका विश्वास भोईर 7वी
5) सोहम विनायक लोबी 8वी
6) राज भास्कर हंबीर 8वी
7) कशिश सुरजित चव्हाण 8वी
8) पूर्वी नामदेव बांगारे 8वी

# मुरबाडच्या अखंड हरिनाम सप्ताहाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड तालुका भागवत वारकरी सांप्रदायिक समाज सेवा मंडळाच्या वतीने भव्य दिव्य अशा स्वरूपात श्रीग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह दि. २ फेब्रुवारी पासून सुरु झाला असून हजारो भाविक भक्त त्यात सामील झाले आहेत. दररोज रामरक्षा या विषयावर महाराष्ट्रातील विख्यात प्रबोधनकार वेदमूर्ती मंदार शास्त्री खळदकर यांची प्रवचने तर प्रख्यात कीर्तनकारांची कीर्तने भाविकांना मंत्रमुग्ध करत आहेत तर पारायण नेतृत्व हभप महंत प्रमोद महाराज जगताप व हभप एकनाथ महाराज कोष्टी करत आहेत.एक अवलिया संत वेदमूती गुरुवर्य श्रीराम गजानन जोशी दादा श्रीदत्त देवस्थान गुरुपीठ सासणे यांनी २९वर्षा पूर्वी या नाम सप्ताहाची वैदिक अधिष्ठान पद्धतीने मुहर्तमेढ रोवली तसेच अशा त-हे चा अभिनव प्रयोग मुरबाड मध्ये सुरु करून पारायण क्षेत्रात क्रांती केली धर्मानुरागी व्यक्तिंना सोबत घेऊन सुंदर संयोजन आणि नियोजन या दृष्टीने आखणी केली. त्यानुसार मुरबाड तालुका भागवत वारकरी सांप्रदायिक समाजसेवा मंडळाचे विश्वस्त अत्यंत मेहनतीने आपल्या सद्गुरुंचे कार्य सेवेच्या माध्यमातून पुढे नेत आहेत. नाम सप्ताहात दररोज हजारो भाविकांना अन्नदान होत असून विविध सामाजिक संस्था मदत करत आहेत. यावर्षी दररोज .परिसरातील हरिपाठ मंडळांना मानपत्र, शाल श्रीफळ, ग्रंथभेट देऊन गौरवण्यात येत आहे मुरबाड गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून आबाल वृद्ध विठू नामाच्या गजरात तल्लीन झाले आहेत.



# स्टेशन परिसरातील चोरीच्या घटनांवर उपाययोजना करण्याची राष्ट्रवादीची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पूर्व स्टेशन रोड परिसरात मागील एक महिन्यात वारंवार झालेल्या दुकानफोडी व चोरीच्या घटनां बाबत संबंधित दोषींवर तातडीने कारवाई करून त्यांच्याविरुध्द कठोर प्रतिबंधात्मक उपयायोजन करण्याची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने करण्यात आली असून याबाबत राष्ट्रवादीचे कल्याण पूर्व विधानसभा अध्यक्ष विक्रांत शिंदे यांनी कोळसेवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची भेट घेऊन पत्र दिले आहे.

कोळसेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या कल्याण स्टेशन रोड व आसपासच्या परिसरात मागील एक महिन्याच्या कालावधीत वेगवेगळ्या ठिकाणी सुमारे चार वेळा दुकानफोडी व चोरीच्या घटना घडलेल्या आहेत. या सतत घडणाऱ्या घटनांमुळे स्थानिक व्यापारी वर्गामध्ये तीव्र भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिक व व्यापारी स्वतःला असुरक्षित समजू लागले आहेत. त्याचा परिणाम त्याच्या व्यवसाय तसेच दैनंदिन व्यवहारावर होत आहे. या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी, परिसरात पोलीस गस्त वाढवणे, रात्री कडक पेट्रोलिंग करणे, संशयित व्यक्तींवर विशेष लक्ष ठेवणे तसेच सीसीटीव्ही व इतर सुरक्षात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबवणे अत्यंत आवश्यक आहे.

तरी या गंभीर विषयाकडे तातडीने लक्ष देऊन सदर घटनांतील आरोपी लवकरात लवकर पकडले जातील अशा प्रकारे तपास यंत्रणा कार्यान्वीत करून त्यांच्यावर कठोर प्रतिबंधात्मक कायदेशीर कारवाई करण्यात यावी. जेणेकरून व्यापारी व नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईल अशी मागणी राष्ट्रवादीच्या वतीने कोळसेवाडी पोलिसांकडे करण्यात आली आहे.



# जीवनदीप महाविद्यालयात आरोग्य आढावा बैठक संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली** : आरोग्य हीच खरी संपत्ती आहे व या संपत्तीचे जतन केले पाहिजे तिची काळजी घेतली पाहिजे; कल्याण तालुक्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांचे कर्मचारी व सक्रिय आशा सेविका यांच्यासमवेत जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे दिनांक ०५-०२-२०२६ रोजी कार्यसम्राट आमदार किसन कथोरे यांच्या उपस्थितीमध्ये आरोग्य आढावा बैठक घेण्यात आली. या आरोग्य बैठकीमध्ये आमदार साहेबांनी उपस्थित सर्व आशा सेविकांना ग्रामीण भागात नागरिकांचे आरोग्य विषयक प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी मार्गदर्शन केले. त्यामध्ये महिलांचे आरोग्य, हिमोग्लोबिन , क्षयरोग, कर्करोग इत्यादी आजारांच्या निदानासाठी सकारात्मक चर्चा करण्यात आली. तसेच अशा सेविकांचे प्रश्न जाणून घेतले व ते सोडवण्याचे आश्वासन दिले. सदर आरोग्य सभेला जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे आशा गुंजाळ (तालुका वैद्यकीय अधिकारी) दिनेश कथोरे (भाजप नेते ) सौ .जयश्री सासे व कार्यकर्ते उपस्थित होते.

जीवनदीप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, संचालक . प्रशांत घोडविंदे, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने सदर आरोग्य आढावा बैठक यशस्वीरित्या पार पडली.



# आ. निरंजन डावखरे यांच्या पाठपुराव्यामुळे विकास निर्णयांना गती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर** : लोकशाहीर आत्माराम पाटील जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे आयोजित पालघर जिल्हा नियोजन समिती (DPDC) बैठक महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री व पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरीत्या पार पडली. या बैठकीस उपस्थित राहून कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी जिल्ह्यातील विविध मूलभूत प्रश्नांवर ठोस मागण्या मांडत अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.बैठकीच्या प्रारंभी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

जिल्हा परिषद शाळेतील मुलींसाठी स्वतंत्र शौचालये व शाळांचे सोलरायझेशन आ. ॲड. निरंजन डावखरे यांनी आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या मार्गदर्शनानुसार ८ मार्चपूर्वी सर्व शासकीय संस्था व शाळांमधील, विशेषतः महिला शौचालयांची कामे पूर्ण करण्याची मागणी केली. तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये वारंवार होणाऱ्या वीज समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून सर्व शाळांचे सोलरायझेशन व CCTV बसवण्याची मागणी केली. यावर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मनोज रानडे यांनी पुढील दोन वर्षांत सोलर व CCTV कामे पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

### स्मशानभूमीतील मूलभूत सुविधा

जिल्ह्यातील अनेक स्मशानभूमींमध्ये वीज, पाणी व अपूर्ण बांधकाम असल्यामुळे नागरिकांना गैरसोयी होत असल्याचे निदर्शनास आणून देत आ. ॲड. निरंजन डावखरे यांनी संबंधित कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. प्रशासनाने या बाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

### आरोग्य सुविधा – सर्पदंश उपचार

पालघर हा आदिवासी बहुल जिल्हा असल्याने सर्पदंशाच्या घटना वारंवार घडतात. यासाठी आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक प्रतिविष औषधे पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

### कृषी व मत्स्य व्यवसाय सक्षमीकरण

अमृत सरोवर योजनेअंतर्गत मत्स्यपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रशिक्षण व साक्षरता देणे, तसेच नारळ व काजू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र सरकारच्या नव्या अर्थसंकल्पातील योजनांची माहिती देऊन त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे आ. ॲड. डावखरे यांनी नमूद केले.

याव्यतिरिक्त शासनाकडून पालघर जिल्ह्यासाठी ६७४.१७ कोटी रुपयांच्या निधीचा प्रारूप आराखडा निश्चित करण्यात आला असून, त्यात आदिवासी उपाययोजनेसाठी ४१०.४३ कोटी रुपये, सर्वसाधारण घटकांसाठी २९४.७४ कोटी रुपये आणि विशेष घटकांसाठी १४ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. जिल्ह्याच्या वाढत्या गरजा लक्षात घेता आदिवासी उपाययोजनेसाठी अतिरिक्त १०० कोटी रुपये, सर्वसाधारण योजनेसाठी ३३३.५० कोटी रुपये व विशेष घटकांसाठी ४० कोटी रुपयांची मागणी शासनाकडे करण्यात येणार आहे. याचबरोबर पालघर हा आदिवासी बहुल जिल्हा असल्याने आदिवासी समाजाचे दैवत बिरसा मुंडा यांच्या स्मारकासाठी सविस्तर आराखडा तयार करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

बैठकीत पालघर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी वेळबद्ध अंमलबजावणी, विभागीय समन्वय आणि लोकहितकेंद्रित विकास दृष्टिकोन अवलंबण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.



# जिल्हा परिषद निवडणुकीनिमित्त भिवंडीत माजी केंद्रीय मंत्र्यांची आढावा बैठक

## कार्यकर्त्यांकडून स्वबळाचा आग्रह

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ५६ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टीने भिवंडी तालुक्यातील गटनिहाय आढावा घेण्यास सुरुवात केली आहे.माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकांमध्ये आगामी निवडणुक लढविण्याबाबत कार्यकर्त्यांची मते जाणून घेण्यात आली.मात्र ही निवडणूक स्वबळावर लढविण्याची तयारी भाजपचे कार्यकर्ते व पदाधिकारी करत असल्याची माहिती सुत्रांनी दिली. त्यामुळे पुन्हा या निमित्ताने भाजप व शिवसेना आमनेसामने येणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

ठाणे जिल्हा परिषदेची निवडणूक आरक्षणामुळे पुढे ढकलण्यात आली आहे. मात्र, भाजपाच्या कार्यकर्त्यांकडून निवडणुकीची पूर्वतयारी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर पक्षाच्या तयारीचा आढावा आणि कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी बुधवारपासून दौऱ्याला सुरुवात केली.भिवंडी तालुक्यातील दाभाड, मोहंडुळ, बोरिवली, पडघा आणि लोनाड गटातील कार्यकर्त्यांबरोबर संवाद साधण्यात आला. तसेच त्यांच्याकडून महायुतीसंदर्भात मते जाणून घेतली. स्थानिक स्तरावरील पक्षाला अनुकूल स्थितीबाबत मोकळेपणाने चर्चा करण्यात आली. या आढावा बैठकत श्रीकांत गायकर, जगन पाटील यांच्यासह पदाधिकारी व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.भाजपाने ही निवडणूक स्वबळावर लढवावी अशी अपेक्षा काही पदाधिकारी व कार्यकर्तेनी बोलून दाखवली त्यामुळे भाजपा समोर पेच निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दरम्यान, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत युतीबाबतचा निर्णय हा वरिष्ठ पातळीवरून घेतला जाईल. या बैठकीत निवडणुकीतील युती वा स्वतंत्रपणे निवडणुकीबाबत कार्यकर्त्यांची भूमिका बैठकीत जाणून घेण्यात आली, अशी माहिती माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी दिली.

# 'एकलव्य स्कूल'च्या ५८३ जागांसाठी १ मार्चला प्रवेश पूर्वपरीक्षा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : अपर आयुक्त आदिवासी विकास, ठाणे विभागांतर्गत असलेल्या ६ एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. राष्ट्रीय आदिवासी छात्र शिक्षा समितीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ही प्रक्रिया राबविली जात आहे.

या अंतर्गत एकूण ५८३ रिक्त जागांसाठी दि. १ मार्च २०२६ रोजी प्रवेश पूर्वपरीक्षा होणार आहे. इयत्ता सहावीच्या ३६० जागांवर (१८० मुले व १८० मुली) पूर्वपरीक्षेद्वारे प्रवेश दिला जाणार असून, इयत्ता सातवी ते नववीच्या २२३ जागांवर गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाणार आहे.

कांबळगाव, शेंडेगाव, सवणे, पळसुंडे (जव्हार), हिरवे (मोखाडा) आणि चळणी (डहाणू) या शाळांमध्ये प्रवेश दिला जाणार असल्याची माहिती अपर आयुक्त आदिवासी विकास, ठाणे गोपीचंद कदम यांनी दिली आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024